**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ०४/१०/२०२२

**दि.०३/१०/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी८२९/२०२२भा. द. वि. संहिता कलम ३९२, ३४. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०२/१०/२०२२ रोजीचे २३.३० वा. चे सुमारास आरती प्लॅस्टीक कंपनीसमोरील रस्त्यावर, गायवासरु चौक ते बसवेश्वर चौका दरम्यान, मोहननगर, चिंचवड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०३/१०/२०२२ रोजीचे ०३.०६ वा. |
| फिर्यादी | :- | कु. निलेश सुरेश कुदळे, वय- १८ वर्षे, जात- हिंदु- माळी, धंदा- शिक्षण, रा. लक्ष्मणदातीर चाळ, मोहननगर, चिंचवड, पुणे. |
| आरोपी | :- | अनोळखी ४ इसम, आरोपी अटक नाही |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांच्या मित्रासह पायी जात असताना यातील आरोपींनी आपापसात संगणमत करुन त्याच्याकडील डीओ दुचाकीवरुन येवुन फिर्यादीच्या हातातील ५०००/- रु किं चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन जबरदस्तीने घेवुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सहा पोलीसनिरी शेटे, ७२४९३४७३४७ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ९४८/२०२२ भा.दं.वि. सं. कलम १४१, १४२, १४३, ४४५, ४३६, ४४७, ५०४, ५०६ (१), क्रिमीनल लॉ अमेंटमेंट कलम ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/१०/२०२२ रोजी सकाळी १०/०० वा. कासासाई येथे सर्व्हे नं. ६३/१ मध्ये ८८ गुंठे व सर्व्हे नं. ६३/५ |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/१०/२०२२ रोजी १८.४९ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)रामचंद्र साधु गायकवाड, २)सचिन गायकवाड, ३)अजित रामचंद्र गायकवाड, ४)रंजित रामचंद्र गायकवाड, ५)शाम अंकुश शितोळे व इतर १० ते १२,**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी हया त्यांच्या शेतात गेल्या असता यातील आरोपी मजकुर यांनी फिर्यादी यांचे शेतातील पत्र्याचे रूम व त्यामधील साहीत्य जाळुन व १० ते १२ गुंठे शेतातील सोयाबीनचे पिक काढुन नुकसान केले व आरोपी क्रं १ यांनी फिर्यादीस शिवीगाळ केली व ही जागा आमची आहे तु येथुन निघुन जा, नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही, तुम्हांला ६ महिने जेलमध्ये टाकु आणि तुझ्या संपुर्ण कुटुंबाला पॅरेलेस करेन अशी धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | संदिप देशमुख, सहा.पोलीस निरीक्षक ९४२००५७१७३ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ४४२/२०२२भा.द.वी कलम,१४३,१४७,१४९, ३५४, ३२४, ३२३, ५०४,५०६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/१०/२०२२ रोजी सकाळी ०९/०० वा.चे सुमारास राहते घराचे समोर, स.नं.११६४, स्टेशन चौकाजवळ, तळेगाव दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/१०/२०२२ रोजी २२/५५ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) उमाकांत किसनराव पवार,वय ६६ वर्ष, रा.सदर, २) चेतन उमाकांत पवार,वय ४० वर्ष,रा.सदर, ३) नितीन उमाकांत पवार,वय ३७ वर्ष,रा.सदर, ४) तुषार उमाकांत पवार, वय ३३ वर्ष,रा.सदर, ५) मेफुज (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) व ६) मामु (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे राहत घराचे समोर आरोपी क्रं १ याचे कामगार आरोपी क्रं ५ हा लघुशंका करत असताना फिर्यादीने त्यास येथे लघुशंका करु नको असे बोलले असता त्या कारणावरुन आरोपी मजकुर या सर्वांनी मिळुन फिर्यादीस वाईट वाईट शिवीगाळ करुन धमकी देवुन लाकडी दांडके,लोखंडी रॉड,सिमेंटचा ब्लॉक यांनी फिर्यादीचे मुलास शिवराज पवार याचे डोक्यावर व इतर ठिकाणी मारुन जखमी केले. तसेच आरोपी क्रं १ याने “ तु राड आहेस,छिनाल आहेस, तु किती जणाखाली झोपली आहे हे मला माहित आहे असे बोलुन मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पठारे ८८८८८१०९५७ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चिंचवड ४६५/२०२२ भादवि कलम - ३५३,३३२,५०४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०३/१०/२०२२ रोजी दुपारी १२/३० वा. चे सुमारास जुना जकात नाका चौक,(जैन शाळा कॉर्नर) चिंचवड पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०३/१०/२०२२ रोजी १५/२३ वा. |
| फिर्यादी | :- | शरद जयहिंद बंडगर, वय – ३० वर्ष, व्यवसाय- ट्रॉफीक वॉर्डन, रा.ज्ञानदिप कॉलनी, थोपटेबिल्डींगच्या पाठीमागे,रहाटणी फाटा,काळेवाडी |
| आरोपी | :- | चारचाकी गाडी क्रं. एम एच.१४/ईयु.००४८ या मधील चालक हंसराज दगडु ठाकरे,वय-३८ वर्षे, रा.ए-१५,पंचरत्न कॉलनी, चिंचवडे नगर, चिंचवड पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी ट्राफिक वॉर्डन दशरथ शिवाजी खरटमल असे दोघेही जुना जकात नाका चौक,(जैन शाळा कॉर्नर) चिंचवड पुणे येथे जैन शाळेच्या मुलांना ये-जा करण्याकरीता सोईस्कर व्हावे यासाठी जुना जकात नाका चौक येथे वाहतुकीचे नियमन करण्यासाठी कर्तव्यावर हजर असतांना चारचाकी गाडी क्रं. एम.एच.१४/ईयु ००४८ यामधील चालक आरोपी याने त्याची चारचाकी गाडी जुना जकातनाका चौकात ब्रीजच्या खाली रोडच्या मध्यभागी लावल्याने फिर्यादी यांनी तुम्ही तुमची गाडी बाजुला घ्या रोडच्या मध्यभ्‌ागी गाडी लावु नका मागे खुप जास्त ट्राफीक जॅम झालेली आहे असे सांगितल्याने आरोपी याने फिर्यादी यांना गाडी पुढे घेत नाही, काय करायचे ते कर असे म्हणाल्याने फिर्यादी हे सदर चारचाकी गाडीचा फोटो काढल्याने आरोपी याने फिर्यादी यांच्या अंगावर गाडी घातल्याने फिर्यादी यांनी गाडीच्या बाजुला उडी मारली.त्यावेळी चारचाकी गाडी चालक गाडी थांबवुन गाडीतुन उतरुन फिर्यादी यांचे जवळ येवुन मादरचोद तु माझ्या गाडीचा फोटो का काढला असे म्हणुन फिर्यादी यांच्याशी वाद घालुन अंगावर धावुन येवुन फिर्यादी यांचे शर्टची कॉलर पकडुन फिर्यादीस हाताने मारहाण करीत असतांना त्याचे उजव्या हातातील चांदीच्या कडयाचा टोकदार भाग हनुवटीला खुप जोरात लागुन हनुवटीतुन रक्त येत होते तरी सदर इसम फिर्यादी यांना चापटा मारुन जखमी करुन फिर्यादी यांना कर्तव्य करण्यापासुन परावृत्त करुन सरकारी कामात अडथळा आणला आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पोटे ९७६६२६४२६६ |

५.

पोस्टे व गु.रजि.नं. :- पिंपरी ८३०/२०२२, भादंवि कलम ३५४, ३५४(अ), ३२४, ४५२, ३२३, ३५२ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक ३०/०९/२०२२ रोजी १७.०० वा. चे सुमारास १३०१, डी/४, महिंद्रा अँथीया, पिंपरी, पुणे येथेफिर्यादीचे राहते घरी.

गुन्हा दाखल :- दिनांक ०३/१०/२०२२ रोजी१६.४० वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- उमांश चौधरी, वय २३ वर्षे, सध्या रा. एल/२०२, महिंद्रा रॉयल, नेहरूनगर रोड, पिंपरी, पुणे.
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमूद तारिख, वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा फिर्यादी यांचा मित्र असून, तो फिर्यादी यांचेघरी परवानगी शिवाय आला व त्यांचेमध्ये आपसात बोलण्यातून झालेल्या वादावरून आरोपीने फिर्यादी यांना प्रथम चप्पलने मारले, म्हणून फिर्यादीने त्यास विरोध केल्यावर आरोपीने फिर्यादीचे अंगाला गैरपद्धतीने स्पर्श केला व त्यास फिर्यादी विरोध करीत असताना, आरोपीने फिर्यादी यांचे तोंड पकडून बोटांने नखाने फिर्यादी यांचे तोंडाचे आत ओरखडून त्यांना जखमी केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- म.पो उप निरीगिरी मॅडम ८४४६७१४०३५

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- आळंदी ३०६/२०२२ भा.द.वि.क ४२०, ४०६

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २१/१२/२१ रोजी चे १४.०० वा चे दरम्यान मौजे एसबीआय बँकचे एटीएम मध्ये ता. खेड.जि,पुणे. येथे

गुन्हा दाखल :- दि ०३/१०/२०२२ रोंजी १९.१० वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे नवीन एसबीआय बँकचे एटीएम पिन नंबर तयार करण्यासाठी मौजे आळंदी मरकळ रोड ता. खेड जि.पुणे. येथील एसबीआय बँकेच्या शेजारील एटीएममध्ये गेल्या असता त्यावेळी फिर्यादीचे पाठीमागे उभे असलेल्या अज्ञात व्यक्तीने फिर्यादीचे नवीन एटीएम कार्डचा पिन नं पाहीला व हातचलाखीने फिर्यादीचे एटीएम कार्ड बदलले व त्यानंतर शिवबा निवास, वडगाव रोड आळंदी ता. खे.डि पुणे.येथील एसबीआयचे एटीएम मधुन चार वेळा ट्रँन्झँक्शन करून ३६०००/-हजार रूपये काढुन आमची फसवणुक केली आहे

त.अधिकारी/अंमलदार :- पोना रासकर मो नं. ९६१९१८४७२३

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- देहुरोड ६१५/२०२२ भा.द.वि.क ४०६,४२०,आय.टि.अँक्ट ६६ डी प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक१६/०८/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वाजे पासुन ते १७.०० वाजेपर्यत मोबाईलवरून

गुन्हा दाखल :- दिनांक ०३/१०/२०२२ वेळ १२/२२ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- १)यश अग्रवाल पुर्णनाव पत्ता माहित नाही.२) एक महिला नाव पत्ता माहित नाही.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- यातील फिर्यादी यांची जिवनसाथी डॉटकॉम या वेडींग साइटवर आरोपी क्रं १ याचेशी ओळख झाली होती. आरोपी क्रं १ याने फिर्यादीस सांगितले की मी तुझ्यासाठी अमेरिकेतुन गिफट खरेदी केले असुन ते इंडियामध्ये

तुझ्या पत्त्यावर पाठवत आहे. नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना एका महिलेचा ०६९१३०४३८५८ या नंबर वरून फोन आला व फिर्यादी यांना सांगितले कि, मी इंदीरा गांधी एअरपोट दिल्ली कस्टम डीपार्टमेंट मधून बोलत असून तुमचे अमेरीकेतून गिफ़्ट आले असून त्यात महागडया वस्तु असल्याने तुम्हाला कस्टम चार्ज भरावे लागणार आहेत. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपी १ याला फोन करून विचारले असता त्याने फिर्यादी यांना सांगितले की तू चार्जेस भर. त्यानंतर सदर महीलेचा फिर्यादी यांना पुन्हा फोन आला व तिने फिर्यादीस आय. डी. बी. आय. बॅकेचा नाजिर अहमद नाव असलेला अकाउंट नं ०२३११०४०००१६८१७५ हा दिला सदर अकाउंट मध्ये फिर्यादीने ३८,५००/- रूपये ट्रान्सफर केले. थोडया वेळाने सदर महीलेचा पुन्हा फोन आला व फिर्यादीस सांगितले की सदर पार्सल मध्ये २०,००० हजार अमेरीकन डॉलर आहेत तर तुम्हाला परत १,४८,०००/- रूपये सिक्युरीटी डीपॉसिट भरावे लागतील तेव्हा फिर्यादीने पुन्हा आरोपी १ याला फोन करून विचारले असता त्याने फिर्यादीस सांगितले की तू चार्जेस भर. त्यावेळी सदर महीलेने फिर्यादीस यूनियन बॅकचे सैफ खान नाव असलेले ४६५६०२०१०९०८५३७ नंबर चा अकाउंटनंबर पाठविला सदर अकाउंट मध्ये फिर्यादी यांनी १,००,०००/-रूपये व ४८,२५०/- रूपये ट्रासफर केले.नंतर फिर्यादीस समजले की आरोपी क्रं १ व २ यांचेकडुन फिर्यादीची फसवणुक झाली आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि जाधव ८१०८८५६५६५

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- दिघी ४३२/२०२२ भा. द. वि कलम ४२०, ४०६,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- सण २०१२ ते आजपर्यंत परिमल हाईटस, गणेशनगर कॉलनी नं. १५, बोपखेल, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०३/१०/२०२२ रोजी १८/०१ वा

फिर्यादी :- श्री, महेश शामराव कोळगे, वय ४१ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा. गणेशनगर रोड नं. ०५, रविंद्र माळी यांचे खोलीत, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे

आरोपी :- १)परिमल घुले मो. ७८८८२४६२९५ ,२)राजेश तुळशीदास चौधरी मो. ९८९०४७५३७५
**आरोपी क्रं २ अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी त्यांची परिमल हाईटस, गणेशनगर कॉलनी नं. १५, बोपखेल, पुणे येथे फ्लॅट देणार असे सांगुन फिर्यादी यांच्याकडुन ५,१५,०००/- रुपये तसेच महिला साक्षीदार , वय ३३ वर्षे, यांचेकडुन ५,००,०००/- रुपये व इसम नामे दिलीप दशरथ लिंगवत, वय ४५ वर्षे, यांचेकडुन ९,००,०००/- रुपये घेवुन आम्हाला फ्लॅट दिले नाही. आमच्याकडुन एकुण १९,१५,०००/- रुपये घेवुन आम्हाला फ्लॅटचा ताबा न देता ते दुस-या इसमांना विकुन टाकले व फसवणूक करुन आमच्या मालमत्तेचा अप्रामाणिक अपहार केला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि हरगुडे ९८९०४१२४०३

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण १५६४/२०२२ भा .द.वि.कलम ४१५,४१७,४२०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०७/०८/२०२० रोजी सकाळी ११/०० ते आजपावेतो जमीन गट नं १६७४ आंबेठाण चौक, चाकण ता खेड

जि पुणे.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/१०/२०२२ रोजी १९/१५ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | सचिन मोहन शेवकरी वय ४५ वर्षे रा. झित्राईमळा, चाकण ता खेड जि पुणे, **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर याने किरण सुर्यकांत शेवकरी यांची ०६ मजली इमारत बांधण्यासाठी घेतली असताना त्यास खरेदी विक्रीचे कोणतेही अधिकार नसताना फिर्यादीस त्यांची २०० चौ.फुट मिळकत इमारत बांधण्यासाठी अपुरी पडत असल्याने ती दिनांक ०७/०८/२०२० रोजी फिर्यादी सोबत करारनामा करून घेवुन त्या बदल्यात इमारती मधील एक गाळा देण्याचे आमिश दाखवुन जमिन मिळकत घेवुन फिर्यादीस गाळान देता त्यांची फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मडके ९८५०२२९३१६ |